ग्रामपंचायत अधिकारी या संवर्गातील अस्थायी कर्मचा-यांना स्थायित्व प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग २
साप्रवि-२/ग्रापं-१/५९७/२०२६
दिनांक:-स्वाक्षरीखाली नमूद केलेप्रमाणे

वाचा :- १.शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र एसआरव्ही/१०७५/१० दि.१९/९/१९७५
२.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र स्थाप्रप-१४१४/ (प्र.क्र. ७३/१४)/ १३-अ दि.११ सप्टेबर २०१४.
३.सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. स्थाप्रप्र-१४१५/(प्र.क्र.९७/१५) १३-अ दि.२१/०८/२०१५
४.सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. स्थाप्रप्र-१४१५/(प्र.क्र.१४/१५) १३-अ दि.१९/०९/२०१७
५.सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. स्थाप्रप्र-१४२५/४०(प्र.क्र.११/२०२५) का. सेवा ४ दि.११/०६/२०२५
६.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र. साप्रवि -१/र.व.का./०३१६/७३१/२०२२ दि.१२/१०/२०२२

स्थायित्व प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, शासन परिपत्रक क्रमांक:- स्थाप्रप्र-१४२५/४०(प्र.क्र.११/२०२५)/का. सेवा ४, दिनांक ११ जून २०२५ मधील सूचना क्रमांक १ येथे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती खाली नमुद करण्यात आलेल्या अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पूर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार ते कर्मचारी आवश्यक त्या सर्व प्रयोजनार्थ त्यांच्या नावासमोर स्तंभ -४ मध्ये नमुद केलेल्या पदावर स्तंभ-७ मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासुन स्थायी शासकीय कर्मचारी म्हणुन समजले जाण्यास पात्र आहेत.

अ.क्र.	शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व सध्याचे पदनाम	तालुका	ज्या पदावर स्तंभ क्र.१ मधील कर्मचाऱ्यास स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे पदनाम	कंत्राटी पदावरील नियुक्ती दिनांक	नियमित पदावरील नियुक्ती दिनांक	कोणत्या दिनांकापासून देण्यात आले	शेरा
१	२	३	४	५	६	७	८
१.	श्री. परशराम नामदेव हासे, ग्रामपंचायत अधिकारी	कोपरगाव	ग्रामसेवक	२४/०४/२०१५	२४/०४/२०१८	०४/०६/२०२२	सेवाप्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिल्याचा दिनांक
२.	श्री. रामचंद्र अभिमन्यु शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी	जामखेड	ग्रामसेवक	-	१६/०५/१९९०	०५/१२/१९९६	सेवाप्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक

वरील प्रमाणे प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षाची नियमीत सेवा पुर्ण करणाऱ्या पात्र अस्थायी कर्मचाऱ्यास व संदर्भ क्र.५ मध्ये नमुद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यास संदर्भ क्र.६ नुसार मला दिलेल्या अधिकारानुसार स्थायित्वाचे प्रमाणपत्र देणेत येत आहे.

सदर प्रमाणपत्राची संबंधीत कर्मचाऱ्याचे मुळ सेवा पुस्तकात नोंद घेणेपुर्वी उक्त अटी व शर्तीची पुर्तता संबंधीत कर्मचारी करीत असल्याबाबतची शहानिशा कार्यालय प्रमुख यांचेकडून संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकावरुन करुन घेणेत यावी व त्यानंतरच सदर प्रमाणपत्राची नोंद घेणेत यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडे सादर करावा.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.__20261107060215_____असा आहे.

Digitally signed by
DADABHAU NAMDEV GUNJAL
Date: 07-11-2026 15:54:41
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सर्व संबंधित ग्रामपंचायत अधिकारी,
द्वारा - गटविकास अधिकारी,पंचायत समिती कोपरगाव, जामखेड.

प्रत - गटविकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव, जामखेड.

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि प अहिल्यानगर.